Impact Factor 2.147

ISSN 2349-638x

Refereed And Indexed Journal

AAYUSHI INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL (AIIRJ)

Monthly Publish Journal

VOL-III ISSUE-XII Dec. 2016

Address
•Vikram Nagar, Boudhi Chouk, Latur.
•Tq. Latur, Dis. Latur 413512
•(+91) 9922455749, (+91) 9158387437

Email
•aiirjpramod@gmail.com

Website
•www.aiirjournal.com

CHIEF EDITOR – PRAMOD PRAKASHRAO TANDALE

महिपतीबुवा ताहराबादकर यांच्या चरित्रलेखनाची वैशिष्टये

डॉ. बालाजी विठ्ठलराव डिगोळे
मराठी विभाग प्रमुख,
शिवजागृती महाविद्यालय, नळेगाव

प्राचीन मराठी चरित्र वाङमयात महिपती हे थोर संत चरित्रकार होत. 'भक्तिविजय', संतलिलामृत', 'भक्तलिलामृत', 'संतविजय' हे महिपतीचे चार प्रसिध्द ग्रंथ आहेत. यात महिपर्तीनी सर्व ग्रंथात मिळून जवळपास 250 पेक्षा अधिक संताचे चरित्रे वर्णन केले आहेत. अभ्यासक्रमात 'संतविजय' हा ग्रंथ समाविष्ट करण्यात आला असला तरी तो उपलब्ध नसल्यामुळे महिपतीच्या इतर उपलब्ध असलेल्या 'भक्तविजय', 'भक्तलीलामृत' या ग्रंथाच्या आधारे महिपतीच्या चरित्र लेखनाची वैशिष्टये पाहणे साईस्कर ठरेल.

नामदेवांने ज्ञानेश्वरांचे चरित्र लिहून संत चरित्र लेखनाचा एक नवा आकृतिबंध मराठीत निर्माण केला. तत्पूर्वी महानुभाव पंथियांनी 'लीळाचरित्र', 'गोविंदप्रभुचरित्र' या चरित्र ग्रंथाची गद्यात निर्मिती केली होती. म्हाइंभटाचे हे चरित्र लेखन अतिशय साक्षेपाने करण्यात आले. यात समाविष्ट केलेल्या लीळा खऱ्या आहेत किंवा खोटया आहेत. हे तपासून त्यांचा समावेश चरित्रात करण्यात आला. चक्रधरभक्ती व गुरूप्रेम ही म्हाइंभटाच्या चरित्र लेखनाची मूळ प्रेरणा होती चक्रधरांचा किंवा गोविंदप्रभूंच्या मानवी व दैवी गुणांचे कलात्मक चित्रण म्हाइंभटाने केले आहे. संत नामदेव यांच्या चरित्र लेखनाचे स्वरूप यापेक्षा एकदम भिन्न होते. सत्यासत्यतेच्या (सत्यअसत्य) चिकित्सेत न जाता नामदेवांनी ज्ञानेश्वरचरित्रात एक कल्पित भावसृष्टी निर्माण केली. ज्ञानेश्वरांविषयी वाटणारा, जिव्हाळा, प्रेम यांचे भावपूर्ण चित्रण संत नामदेवांनी केले. प्रामुख्याने ज्ञानेश्वराविषयी वाटणाऱ्या हळव्या भावनेतून हे चरित्र नामदेवांनी लिहिले. त्या निमित्ताने आळंदी क्षेत्राचा महिमा, देवभक्तांचे प्रेम, संत आणि देव यांच्यातील एकरूपता इत्यादी गोष्टींचे वर्णन नामदेवांनी केले. हे वर्णन भक्तीरसास परिपोषक ठरेल असेच होते. प्रत्यक्ष चरित्रातील घटनांच्या ऐतिहासिकतेपेक्षा त्या प्रसंगाचे भावनिक पातळीवर वर्णन करून ही भूमिका नामदेवांनी व्यक्त केली. आणि हीच भूमिका पुढील काळातील सर्व संत चरित्रकारात आढळते. महिपतीने देखील आपल्या संतचरित्रात जी भूमीका घेतली ती संत नामदेवांप्रमाणेच एका भाव कवीची भूमिका घेतली. महाराष्ट्रातील व महाराष्ट्राबाहेरील संताच्या चरित्रातील लोकप्रसिध्द घटना निवडून त्यावर महिपतीने ओवीबध्द अध्यायांची रचना केली. ही रचना करताना घटनांचा क्रम तसेच व्यक्तींची नावे, स्थळ याबाबतीत महिपतीने फारशी चिकित्सा केली नाही. संताच्या चरित्रातील भक्तीभावपूर्ण अशा प्रसंगाचे उठावदार वर्णन करणे एवढीच महिपतीने भूमिका घेतली.

महिपतीने जे चरित्रग्रंथ लिहिले त्यात सुरूवातीस 'भक्तीविजय' हा ग्रंथ लिहिला. या चरित्रातील महिपतीने नाभाजी या हिंदी कवीच्या 'भक्तमाल' या ग्रंथातून केली, तर ज्ञानदेव, तुकाराम, एकनाथ इत्यादी संताच्या चरित्राची माहिती महिपतीस संत नामदेव यांनी लिहिलेल्या ज्ञानेश्वर चरित्रातून मिळाली तसेच महिपतीच्या नजरेस ज्या प्रमाणात नवी नवी साधनसामुग्री आली. तिचा उपयोग करून त्याने पुढील ग्रंथ लिहिले. जसे महिपतीने संत एकनाथ यांचे केशवस्वामी यांनी लिहिलेल्या विस्तृत चरित्राचा आधार घेऊन संत एकनाथांचे चरित्र 'भक्तलीलामृता'त वर्णन केले. किंवा संत तुकाराम यांच्या वंशजाकडून महिपतीस भरपूर माहिती मिळाली त्याचा उपयोग करून महिपतीने संत तुकारामांचे चरित्र अतिशय विस्ताराने 'भक्तलीलामृत' वर्णन केले तर समर्थ रामदास यांच्या संप्रदायाच्या अनेक मठातून व मंदिरातून महिपतीस जी साधने मिळाली तिचा उपयोग करून महिपतीने समर्थांचे चरित्र 'संतविजयात' वर्णन केले. अशा तऱ्हेने महिपतीने जी संतचरित्रे लिहिली किंवा संताच्या वंशजाकडून मिळालेली माहिती किंवा संताच्या विषयी त्या त्या परिसरात उपलब्ध झालेल्या अख्यायिका दंतकथा यांचा महिपतीने उपयोग करून घेतला आणि त्याआधारे आपले चरित्रग्रंथ लिहिले अर्थात

मिळालेल्या साधनात चिकित्सक उपयोग करून घेण्याचे ज्ञान महिपतीजवळ नव्हते. संताविषयी वाटणाऱ्या प्रेमभावनेतून महिपतीने त्यांच्या चरित्रातील उपलब्ध प्रसंगाचे भावभक्तीपूर्ण चित्रण केले आहे.

महिपतीच्या चरित्र लेखनाचे स्वरूप मालिकेप्रमाणे आहे. एखाद्या संतांचे चरित्र तीन ते चार अध्यायात वर्णन केल्या नंतर त्यानंतर अध्यायात वर्णन केल्यानंतर पुढील संताचे वर्णन महिपती करतो. केंव्हा केंव्हा एखाद्या संताच्या चरित्रावर एकच अध्याय लिहिलेला असेल किंवा कधी कधी एखाद्या अध्यायात एकापेक्षा अधिक संताचे चरित्र वर्णन केलेले आढळतात. एखादा परिणामकारक प्रभावित प्रसंग रेखाटून श्रोत्यांचे अंत:करण हेलावून टाकणे ही महिपतीच्या चरित्र लेखनाची खास लकब आहे. याच शैलीतून अनेक संताच्या चरित्राची मालिका महिपतीने लिहून ठेवली. कांही चरित्र ग्रंथात मात्र अतिशय विस्ताराने महिपतीने चरित्र लेखन केले. जसे 'संतविजय' या ग्रंथातील एकूण 26 अध्यायापैकी 25 अध्यायात समर्थ रामदास स्वामी यांचे चरित्र वर्णन केले आहे किंवा भक्तलीलामृत केवळ संत तुकाराम यांचे चरित्र 16 अध्यायात वर्णन केले आहेत. किंवा संत एकनाथ यांचे देखील 12 अध्यायात चरित्र 'भक्तलीलामृत' महिपती वर्णन करतो अशा रितीने सुरूवातीच्या काळात महिपतीने कांही जून्या ग्रंथांचा आधार मिळवून चरित्र लेखन केले असले तरी नंतर त्याने स्वत: हिंडून संतांच्या चरित्राची माहिती गोळा केली आणि संताच्या चरित्राचा जो भाग यापूर्वी लिहावयाचा राहून गेला त्यावर महिपतीने भरपूर प्रकाश टाकला. 'संतवजिय' (रचनाकाल इ.स.1790) हा महिपतीचा शेवटचा चरित्र ग्रंथ असून तो अपूर्ण राहिला. त्यानंतर महिपतीचे देहावसान झाले.

महिपती याने आयुष्यभर संतचरित्राचे लेखन केले. त्या लेखनाचा शेवटपर्यंत ध्यास घेतला. आयुष्याच्या सुरूवातीस महिपतीकडे वडिलोपार्जीत जो कुलकर्णीपणाचा व्यवसाय चालत होता; परंतु लहानपणापासूनच पांडूरंग भक्तीकडे ओढा असलेल्या महिपतीचे या व्यवसयात लक्ष लागले नाही. या व्यवसायामुळे आपल्या भक्तीत अडथळा निर्माण होतो. असे लक्षात येताच महिपतीने तो व्यवसाय सोडला. आणि आपले लक्ष पूर्णपणे विठ्ठलभक्तीकडे वळविले त्यास संत तुकाराम यांचा अनुग्रह लाभला होता. संत तुकाराम यांच्या कृपेनेच आपण संतचरित्रे लिहिण्याकडे प्रवृत्त झालो असे अनेक ठिकाणी महिपतीने म्हटले आहे. आयुष्यभर संतचरित्रे लिहिणारा महिपती हा एकमेव ग्रंथकार आहे. अर्थात वर उल्लेखिलेल्या ग्रंथाव्यतिरिक्त 'पंढरीमहात्म्य', 'पांडूरंगस्तोत्र', 'तुलसीमहात्म्य' इत्यादी पौराणिक कथा ग्रंथ महिपतीने लिहिले. तरी पण संतचरित्रकार म्हणून मराठी साहित्याच्या इतिहासात महिपतीचे नाव आजरामर ठरले आहे. महिपतीच्या काळातच महिपतीच्या संतचरित्रांचे वाचन, श्रवण केले गेले. कवीवर्य मोरोपंत यांनीदेखील महिपतीच्या या कार्याची प्रशंसा करणाऱ्या 13 आर्या लिहिल्या आहेत. यावरून महिपतीच्या चरित्रलेखनाचा प्रभाव त्या काळातील विद्वान कवींवर झाला होता असे दिसून येते.

महिपतीच्या कालखंड म्हणजेच पेशवाईचे मराठीत जे कांही कवी व ग्रंथकार आढळतात त्यांचे कर्तृत्व विशेष उल्लेखनिय नव्हते. पंडिती काव्य व आख्यानकाव्य यांचा ऱ्हास झालेला दिसून येतो. जसे - विठ्ठल बिडकर, नागेश भिंगारकर यांची कविता किंवा संतकवितेला देखील पेशवाईत ओहोटी निर्माण झाली होती. संत तुकाराम व रामदास यांच्या निर्वाणानंतर त्यांच्य तोडीचा एकही रचनाकार मराठी साहित्यात निपजला नाही. खोटे पांडित्य आणि शब्दलंकाराची हौस असणाऱ्या पेशवाईत निपजले. मध्वमुनी अमृतराय हे पेशवाईतील प्रसिध्द रचनाकार व कीर्तनकार होते. परंतु त्यांचा प्रभाव पेशाईतील उच्चवर्णीय सरदार, दरकदार यांच्यावर होता. या पार्श्वभूमीवर महिपतीचे चरित्रलेखन मराठी साहित्याच्या दृष्टीने संजीवक ठरले. अतिशय सोप्या भाषेत ओवीचा वापर करून महिपतीने संतचरित्रे गायली. आता पर्यंत पुराणातील देवदेवतांनी मराठी कथा साहित्यात आणि काव्यात खुप गर्दी केली होती. त्या पार्श्वभूमीवर महिपतींने मानवी जीवनाचे मार्गदर्शक ठरणारे संत आणि त्यांचे आदर्श आपल्या चरित्रातून लोकांसमोर ठेविले आणि लोकांनी मोठया प्रेमाने महिपतीच्या या चरित्रांचा स्वीकार केला. महिपतीचे लेखन लोकप्रिय ठरले. श्रीधर व महिपती हे दोन्ही महाराष्ट्रातील लोकप्रिय ग्रंथकार आहेत. श्रीधराने 'पांडवप्रताप', 'हरिविजय', 'शिवलीलामृत' यासारखे लोकांना समजणारे ग्रंथ लिहून लोकप्रियता मिळवली. त्याचप्रमाणे महिपतीने संतांची चरित्रे गाऊन तो देखील लोकप्रिय ठरला.

महिपतीच्या चरित्रलेखनात पौराणिक पध्दतीचा अवलंब केलेला असून जसे - अध्यायाच्या सुरूवातीस 'गणपती व सरस्वतीस नमन गुरूचे स्तवन' त्या अध्यायात जी कथा वर्णन करावयाची आहे. त्यांचे थोडेसे अनुसंधान

श्रोत्यांना कथेचे श्रवण करण्याची नम्र विनंती आणि नंतर प्रत्यक्ष संत कथेला सुरूवात. संताच्या नावागावाचा उल्लेख केल्यानंतर लगेचच महिपती श्रोत्यास कथेच्या ओघात नेतो आणि मग संतांच्या चरित्रातील अनेक अद्‌भूत घटना, चमत्कार याचे वर्णन करून संतांचे अलौकिक व्यक्तिमत्व श्रोत्यांच्या मनावर ठसवितो. हे करताना महिपतीने संतांच्या व्यक्तिमत्वाच्या अनेक पैलूंना स्पर्श केलेला असतो. कोणी कितीही छळ केला, तरी संतांनी मात्र तो छळ सहन तर केलाच; पण छळ करणाऱ्यास क्षमा केली. प्रपंचापेक्षा भक्तीला संतांनी इतके महत्व दिले की, त्यांच्या प्रपंचाचे स्वरूप अतिशय वाईट झाले. तरी पण संतांनी प्रपंचाकडे दुर्लक्ष केले आणि भक्ती केली भक्तीने देवास वश केले. देव देखील संतांना वश झाला म्हणूनच त्याने जनीचे दळण दळले, कबीराचे शेले विणले (वरून) किंवा ढोरे वडली. देव आणि भक्त यातील प्रेमळ संबंधाना फूलवून लोकांच्या मनात संताविषयी आणि देवाविषयी महिपती विलक्षण प्रेम निर्माण करतो. महिपतीच्या चरित्र लेखनाची ही मुख्य हातोटी आहे.

महाराष्ट्रातील कीर्तन परंपरेने चरित्र वाङ्‌मयाचा विकास केला आहे. कीर्तन हे मध्ययुगातील एक फार मोठे प्रभावी प्रसार माध्यम होते लोकांच्या मनात धर्म, निती, भक्ती यांची शिकवण संतांच्या आख्यानांच्याद्वारे लोकांना दिली जात असत. लोकांचे रंजन करीत संगीत, गायन, नृत्य, अभिनय, विनोद यांच्या माध्यमातून देवादिकांच्या कथा आणि संतांच्या कथा कीर्तनाच्या माध्यमातून लोकापर्यंत पोहोचविल्या जात असत. महिपती स्वतः कीर्तनकार होते त्यामुळे लोकांना कशा पध्दतीने संतांच्या कथा सांगितल्या म्हणजे त्या आवडतील हे महिपतीने अचूकपणे लक्षात घेतले. सर्वसामान्य लोकास उत्तुंग कल्पना विलास समजत नसतो; पण साध्या साध्या उपमा व दृष्टांत लोकांना समजताच व्यवहारातील मार्मिक दाखले उपयोगात आणून महिपती आपले वर्णन समजवितो.

उदाः- चंचल मनाच्या श्रोत्यापुढे कवीचे प्रेमळ, लाघव व्यर्थ ठरते. हे सांगताना महिपती लिहितो ज्याप्रमाणे एका षंढ सुंदर, कामीनीचा कांहीही उपयोग होत नाही ज्वर (ताप) आलेल्या रोग्यास जसे मिष्टान्न व्यर्थ ठरते. किंवा बहिऱ्यापुढे गायनाचा कांहीही उपयोग होत नाही. आंधळयापुढे आरसा दाखवून कांहीही उपयोग नाही. त्याप्रमाणे चंचल मनाच्या श्रोत्यापुढे कवीने कितीही प्रेमळ लाघव दाखविले तरी त्याचा कांही उपयोग होत नाही अशा व्यवहारातील साध्या दृष्टांताचा वापर करून महिपती आपले वर्णन सजवितो. खरे म्हणजे मराठी संतांनी आपल्या साहित्यात फार पूर्वीच या हातोटीचा अवलंब केला होता. तुकोबांनी व्यवहारातील आपल्या मनातील भक्ती भावना व्यक्त करण्यासाठी संतांनी आई आणि बाळाचे नाते, हरीणी आणि पाडस यांची चुकामूक, पक्षीणी आणि पिल्लू यांच्या वियोग आणि प्रेम, गाय आणि वासरू यातील प्रेमळ संबंध योजून आपली भावना व्यक्त केली. संतांच्या वाणीशी महिपतीचे अंतःरण पूर्णपणे समरस झाले आहे. 'तुकोबांचे अभंग', 'नामदेवांचे अभंग' 'ज्ञानेश्वर' 'एकनाथी भागवत' यांचे पडसाद महिपतीच्या संतचरित्रात सतत ऐकू येतात. संतांच्या ठिकाणी असणारी दया, क्षमा आणि शांती, परोपकारीत्व, नम्रता, ईश्वरभक्ती यांचे वर्णन करताना ज्ञानदेव, तुकाराम इत्यादी संतानी ज्या भाषेत केले आहे. अगदी त्याच भाषेचा वापर महिपतीने आपल्या चरित्रलेखनात केला आहे. अनेकदा तर तुकोबांच्या गाथेतील अभंगांचे संदर्भ देऊन किंवा समर्थांच्या 'दासबोधा' तील समासाचे संदर्भ देऊन महिपती आपल्या चरित्राचे अध्याय सजवितो.

उदाः- महिपतीने 'भक्तविजयात' संत तुकाराम आपल्या पत्नीस आदेश करतात असा प्रसंग रेखाटला आहे. तुकोबांच्या गाथेत या आशयाचे 11 प्रसिध्द अभंग आहेत. त्याचाच अनुवाद महिपतीने वरील प्रसंग वर्णन करण्यासाठी केला आहे. 'संतविजय' या ग्रंथात देखील समर्थांचे तत्वज्ञान आचार आणि संघटना चातुर्य वर्णन करण्यासाठी 'दासबोधा' चा आणि त्यातील ओव्यांचा सुरेख वापर महिपतीने केला आहे. अशा वर्णनामुळे चरित्रास वास्तवाचा स्पर्श होतो. त्यातील वर्णन संतांच्या वाणीत लिहिल्यामुळे एक प्रकारची नाटयात्मकता त्यास प्राप्त होते. व्यक्तिंच्या तोंडी घातलेले संवाद हे संताच्या साहित्य कृतीतीलच संवाद असतात. त्यामुळे संताच्या व्यक्तिमत्वाचा श्रोत्यांना अधिक जवळून संबंध येतो आणि आशय परिणामकारक थोडक्यात माहिपती चरित्र गायनावरून करताना संताच्याच भाषेत श्रोत्याशी बोलतो. इतका तो तत्वज्ञानाशी आणि अभंग, ओवीशी एकरूप झाला आहे हे दिसून येते. या गुणास 'अवतरणक्षमता' असे म्हणतात. संताची अनेक अवतरणे वापरून संताचेच चरित्र लिहिण्याचा एक नवा उपक्रम महिपतीने मराठीत रूढ केला. वाङमयीन दृष्टया महिपतीच्या दृष्टांतातील महिपतीच्या चरित्रलेखनाचे मूल्य फार थोडया समीक्षकांच्या लक्षात आले आहे.

पाल्हाळीकपणा दृष्टांतातील तोच तोच पणा चमत्कार आणि दंतकथा यांचे संताच्या भोवती निर्माण केलेले वलय हे महिपतीच्या चरित्र लेखनातील दोष आहेत महिपतीने कोणत्याही संतांच्या चरित्रात त्याच्या भोवती असणाऱ्या सामाजिक स्थिती गतीचे वर्णन केले नाही. एखादा संत ज्या गावी जन्मला किंवा जेथे त्याचे समाधीस्थान आहे. तेथील सामाजिक परिसराबद्दल किंवा भौगोलिक परिसराबद्दल कोणतेही वर्णन करीत नाही. या बाबतीत महानुभाव चरित्रकार अतिशय सतर्क आहेत चक्रधर यांचा मुक्काम जेथे कोठे असे त्या गावांच्या बाजारांचे वर्णन, तेथील देवळांचे वर्णन, भोवताली असणाऱ्या टेकडया, मळे, बागा इत्यादींचे वर्णने इतकी हुबेहुब असतात की, आजही आपण त्या वर्णनाचा पडताळा घेऊ शकतो. गोविंदप्रभू किंवा चक्रधर यांच्या पोशाखाचे त्यांच्या रंगरूपांचे शारिरीक हालचालींचे, मानसिक हालचालींचे इतके सुंदर चित्रण महानुभाव पंथात आढळते की, त्याला चरित्र वाङ्मयात दुसरी तोड नाही. त्या तुलनेत महिपतीच्या चरित्र लेखनात यापैकी कांहीही आढळत नाही. त्यामुळे महिपतीचे चरित्रलेखन आणि त्यातील व्यक्ती बिनचेहऱ्याच्या वाटतात. चमत्कार आणि दंतकथा यात देखील तोच तो पणा आढळतो. त्यामुळे महिपतीच्या चरित्रलेखनाचे चरित्रग्रंथ म्हणून कमी मूल्य ठरते. हे नाकारण्यात कांहीच अर्थ नाही; परंतु महानुभावी ग्रंथकार आणि महिपती यांच्यात तुलनाच होऊ शकत नाही. कारण म्हाइंभट याने चक्रधर व गोविंदप्रभू यांच्या सहवासात बराच काळ घालविला होता. त्यांच्या स्वभावाचे अतिशय जवळून निरीक्षण केले होते. त्यामुळे त्यांच्या आठवणी गोळा करून त्यांचे चरित्र लिहिणे म्हाइंभटास सोईस्कर झाले. त्याउलट महिपतीने ज्यांची चरित्रे लिहिली त्या संतांच्या काळात आणि महिपतीत शेकडो वर्षाचे अंतर होते. हे लक्षात घेतले पाहिजे. मिळतील त्या साधनावर महिपतीस अवलंबून रहावे लागले महिपतीने संतांचे चमत्कार व दंतकथा लिहिल्या आहेत. ही गोष्ट खरी आहे; परंतु महिपतीने आपल्या मनाने त्यांचे वर्णन केले नाही, तर त्यास संतांच्या वंशजाकडून मिळालेल्या माहितीचा आधार असतो. किंवा संताच्या चमत्काराचे मूळ लोकमानसात आहे. लोकाकडून महिपतीस अनेक कथा मिळाल्या. अशा माध्यमातून मिळालेल्या कथांचा मोठया श्रध्देने व भाबडेपणाने माहिपतीने आपल्या चरित्रलेखनासाठी उपयोग करून घेतला एवढेच म्हणता येईल.

महिपतीच्या चरित्र लेखनात अनेक दोष व उणिवा आहेत. संताच्या चरित्रातील चमत्कांराचे वर्णन करताना महिपतीने कोणतीही चिकित्सा केली नाही. समर्थ रामदास यांच्यापूरते सांगावयाचे म्हटले तरी महिपतीने रामदास हे मारोतीचे अवतार आहेत असे कथन केलेले आढळते. समर्थांना मारोतीने आयोध्या नगरीचे दर्शन घडविले. तसेच प्रत्यक्ष रामाचे दर्शन संभाषण झाल्याची महिपतीने वर्णन केलेले आहे. अनेक हास्यास्पद कल्पना समर्थांच्या बाबतीत माहितीने 'संतविजयात' चित्रित केले आहे. जसे मारोती प्रमाणेच समर्थांना देखील शेपूट होते. मारोतीप्रमाणेच एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी उड्डाण करीत असत. अशा कांही हास्यास्पद कल्पना महिपतीने चित्रित केले आहे. महिपतीच्या इतर चरित्र ग्रंथांतही संताच्या बद्दल अनेक गमतीदार कल्पना लिहिल्या आहेत. जसे रामदासांनी सावधान म्हणताच लग्न मंडपातून पळ काढला. ही घटना प्रत्यक्षात घडणे अशक्य आहे. तथापि महिपतीने त्याचे वर्णन केले. इतर संताच्या बाबतीत देखील निर्जीव भिंत चालविणे, मृत व्यक्तीस जीवंत करणे, अदृश्य होणे, किंवा अग्नी, पाणी यांच्यापासून सुरक्षित राहून दाखवणे इत्यादी चमत्कार महिपतीने संतचरित्रात जागोजाग वर्णन केले आहेत. परंतु चमत्काराबरोबरच संत हे मानवी मूल्यांची आदर्श होते. हे दाखविण्यास महिपती हा विसरत नाही. संताच्या ठिकाणी सर्वसामान्य माणसात दुर्मिळ असणारे अनेक गुण होते. वैराग्य, भक्तीज्ञान याबरोबरच दया, परोपकार, क्षमा, शांती, समाधान या उच्च नैतिक मूल्यांचे आदर्श म्हणजे संत होते. संतत्व हे जाती, धर्म, पंत, देश, भाषा यावर अवलंबून नाही तर संतत्व ही एक वृत्ती आहे. ज्यात मानवतेचे उच्च मूल्ये सामावलेली आहेत. संताचा देह माणसाच्या ऱ्हदयात होता. दुसऱ्याच्या दुःखात संत दुःखी होत, दुसऱ्याच्या सुखाने त्यांना सुख वाटत असे दुसऱ्यास आनंद मिळावा म्हणून संतानी दुःख, अपमान, छळ सहन केला. हे संताच्या ठिकाणी असणारी दुर्मिळ गुण वर्णन करताना महिपतीची वाणी सद्गदीत होते. संतानी चमत्कार केले त्याचे कारण धार्मिक ऱ्हास भक्त लोकांचे लक्ष वेधण्यासाठी संताना चमत्कार करावे लागले.गुलामगीरीच्या अवस्थेत परधर्मियांच्या राजसत्तेखाली चिरडून जाणाऱ्या समाजात संतांनी आपले तेज चमत्काराच्या रूपात प्रगट करून राजसत्तेलाही नमविले. जसे सेना न्हावी याने बिदरच्या बादशहास आरशात पाहून रंगाचे रूप दाखविले, अत्यंत उन्मत्त व मुजोर राज्यकर्ते जेंव्हा संतासमोर नतमस्तक होतात. ते चित्र डोळयासमोर आणण्यास आपणास समाजाची अस्मिता संतामुळेच प्रकाशात आली हे स्पष्ट होते. ज्ञानाची मक्तेदारी

केवळ उच्च वर्णियाकडे नसून परमेश्वराचे ज्ञान व भक्ती कोणीही संपादन करू शकते. इतकेच नव्हे तर देव देखील संताची जात, धर्म, स्तर न पाहता त्यांची सेवा करतो. अशी ऱ्हदय चित्रे महिपतीने रेखाटली अशा चित्राचे महिपतीच्या वर्णन शैलीच्या दृष्टीने मूल्य मोठे आहे. म्हणून महिपतीने जे चरित्र लेखन केले त्यांची ऐतिहासिक विश्वसहनीयता सिध्द होत नसली तरी त्यांचे सांस्कृतिक महत्व अतिशय मोठे आहे.

सी.ए.किंकेड :- याने महिपतीच्या चरित्र लेखनाचे मूल्यमापन करताना खालीलप्रमाणे उद्गार काढले आहेत. खरोखर महिपतीने जर आपले ग्रंथ लेखन मराठी खेरीज जगात जास्त प्रचलित असलेल्या दुसऱ्या कोणत्या तरी भाषेत केले असते, तर त्याचे नाव जगातील उत्तम कवीत प्रमुख मानले गेले असते. त्यांच्या काव्यातील सहज, सुलभ, चारूता (सुंदर, सौंदर्य), मनोहर छंद आणि त्यातल्या त्यात अभिनव कल्पना प्रक्रियांनाही आदरणीय वाटल्याशिवाय राहत नाही.

जस्टिन ई ॲबट :- या अमेरिकन धर्म प्रचारकाने महिपतीच्या अनेक ग्रंथांची इंग्रजी रूपांतरे केली त्यामुळेच पाश्चात्य अभ्यासकांना मराठी संताच्या चरित्राचा परिचय सुलभतेने होऊ शकला. महिपतीच्या चरित्र लेखनाची ॲबट साहेबांना एवढे वेड लागले की, ते धर्म प्रचार विसरून गेले आणि संत चरित्रात व संताच्या वाणीत विरघळून गेला यावरून महिपतीच्या चरित्र लेखनाचे महत्व लक्षात येऊ शकते.

निष्कर्ष :-

महिपतीने आपल्या साध्या सोप्या भाषेतून खेडयापाडयातून कष्ट करणाऱ्या माणसाच्या ऱ्हदयाचा ठाव घेणाऱ्या संतकथा गायिल्या. ज्याप्रमाणे संतानी सर्व सामान्य माणसास समजेल अशा भाषेचा उपयोग करून लोकांच्या मनाला वेड लावणारे साहित्य निर्माण केले. त्याच परंपरेने महिपतीने रक्षण केले. वास्तविक तुकाराम महाराजांच्या निर्वाणानंतर संतांच्या वाङमयीन परंपरेचा लोपच झाला असता; परंतु संत निळोबाराय व महिपतीबुवा ताहाराबादकर यांच्या कार्यामुळे संतांची परंपरा वाङ्मय रूपाने सुशिक्षित राहिली. समाजात जात, धर्म, पंथ, भाषा यामुळे शेकडो वर्ष जी विषमता आढळते. ती विषमता महिपतीने आपल्या चरित्र लेखनाने पुसून टाकली. सर्व जातीच्या, धर्माच्या, पंताच्या, भाषांच्या संताचे संमेलन महिपतीने भरवले आहे. असे त्यांच्या चरित्र लेखनावरून दिसून येते.

थोडक्यात महिपतीची चरित्रे म्हणजे केवळ भाकडकथा किंवा अद्भूत चमत्कार कथा नसून त्यास महाराष्ट्राच्या सांस्कृतिक इतिहासाच्या दृष्टीने फार मोठे मूल्य आहे हे सिध्द होते.

संदर्भग्रंथ :-

1) (संपा.) चंद्रकांत पालवे, 'संतचरित्रे', महाराष्ट्र साहित्य परिषद, 2005
2) अ.ना. देशपांडे, 'प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास', (भाग सातवा) व्हीनस प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, 1988
3) प्र.न.जोशी, 'मराठी वाङ्मयाचा इतिहास' (प्राचीन काळ : प्रारंभापासून पेशवाई अखेरपर्यंत) प्रसाद प्रकाशन,पुणे द्वितीयावृत्ती, 1978
4) ल.रा.नसिराबादकर, 'प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास', फडके प्रकाशन, कोल्हापूर, सहावी आवृत्ती, 1997.
5) मोहन शेळके, 'प्राचील मराठी वाङ्मयाचा इतिहास', कैलाश पब्लिकेशन्स, औरंगाबाद.
6) भुजंग वाडीकर, जीवन पिंपळवाडकर, 'प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास', अभय प्रकाशन, नांदेड, प्रथमावृत्ती 1996
7) रत्नाकर मंचरकर, 'संतांची कथाकविता', स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती, 2012
8)(संपा.) निशीगंधा व्यवहारे,'संत नामदेवांची चरित्रकाव्य'(रचना, स्वरूप आणि समीक्षा),चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती, 2012
9) यशवंत साधु, 'गवाक्ष', रजत प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृती, 1998
10) यशवंत साधु, 'मंथन', स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती, 2002.
11) (संपा.) विद्या व्यवहारे, 'संत नामदेवांचे चरित्रात्मक अभंग', चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती, 2008
12) (संपा.) अशोक देशमाने, 'तीर्थावळीचे अभंग', चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती, 2007.